
# ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती




## ❑७३ वी घटनादुरुस्ती :

- ७३ वी घटनादुरुस्ती ही ग्रामीण पंचायतराजशी निगडित आहे. १९९२ साली ७३ वे घटनादुरुस्ती विधेयक मान्य झाले आणि त्यानुसार २४ एप्रिल १९९३ पासून पंचायतराजची अंमलबजावणी सुरू झाली.
- त्यामुळे पंचायतराज मधील संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला. भारतीय राज्यघटनेत २४३ व्या कलमात पंचायतराजची तरतूद केली आहे.
- ग्रामसभा, ग्रामपंचायत स्थापना, रचना व अधिकार, कार्ये, निधी, हिशोब तपासणी, निवडणुका व निवडणूक यंत्रणा याबाबत तरतुदी केल्या आहेत. या घटनादुरुस्तीनुसार, पंचायती या शीर्षकाखाली राज्यघटनेतील भाग ९-अ हा समाविष्ट केला.
- त्यामध्ये कलम २४३ (ए) ते २४३(ओ) समाविष्ट केले व २९ विषय ११व्या परिशिष्टात जोडले.

- कलम २४३ (बी) नुसार, गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती, जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद या प्रकारे देशात त्रिस्तरीय पंचायतराज अस्तित्वात येईल.
- कलम २४३ (डी-१) नुसार, पंचायतराजच्या संस्थांमध्ये अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवल्या आहेत.
- विविध मतदारसंघांत ते आळीपाळीने ठेवलेले आहे. तसेच १/३ राखीव जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. (सध्या ५० % जागा महिलांसाठी राखीव आहेत.)
- नागरिकांच्या मागासवर्गातील प्रवर्गातील लोकांना २७ % जागा पंचायतराजमध्ये राखीव ठेवल्या आहेत. तसेच विविध मतदारसंघांत ते आळीपाळीने ठेवतात.
- या राखीव जागांपकी १/३ जागा या याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत.
- पंचायतराजमधील संस्थांमध्ये एकूण सभासद संख्येच्या १/३ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. मात्र अनुसूचित जाती-जमातींच्या महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरूनच महिला आरक्षणाचा विचार केला आहे.
- राखीव जागांचे आरक्षण आळीपाळीने सर्व जागांना लागू केले जाते.
- कलम २४३ (ए) नुसार, ग्रामसभेची स्थापना व अधिकारासंबंधी तरतूद कलम २४३ (ए) मध्ये केली आहे.कलम २४३ (इ) नुसार, पंचायत राज मधील सर्व संस्थांना पाच वर्षांचा कालावधी दिलेला आहे. पंचायतराजची एखादी संस्था राज्यशासनाने कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर बरखास्त केली तर सहा महिन्यांच्या आत येथे निवडणूक घ्यावी लागते.
- सामाजिक न्याय व आर्थिक विकासाची जबाबदारी पंचायतराजवर सोपविली आहे.
- पंचायतराजतील संस्थांना आर्थिक अधिकार दिले आहेत. कर लावणे, गोळा करणे व त्याचा विनियोग करणे, इ.
- तसेच गोळा केलेले कर आणि राज्याच्या संचित निधीतून या संस्थांना देण्यात येणारे अनुदान राज्य कायदेमंडळ कायदा करून निश्चित करते. कलम २४३ (आय) नुसार, राज्यपाल राज्य वित्त आयोगाची स्थापना करतील अशी तरतूद आहे.
- महाराष्ट्रात १९९४ साली पहिल्या वित्त आयोगाची स्थापना केली. वित्त आयोग स्थापन झाल्यापासून पाचही वर्षांच्या आर्थिक स्थितीचे परीक्षण करून राज्यपालांना या आयोगाकडून शिफारसी सादर केल्या जातात. त्यानंतर राज्यपाल संबंधित शिफारसी विधानसभेत मांडतात.




- कलम २४३ (जे) नुसार, पंचायतराजतील विविध संस्थांनी लेखापरीक्षणाबाबत आपले हिशोब ठेवून त्यांचे लेखापरीक्षण व्हावे यासाठी राज्य कायदे मंडळाच्या कायद्याद्वारा तरतूद करता येते.
- कलम २४३(के) नुसार, राज्य निवडणूक आयोग स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने १९९४ साली राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली.राज्यातील पंचायतराजच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली.
- मतदारयाद्या तयार करणे, निवडणुकांचे आयोजन करणे, त्यावर नियंत्रण व देखरेख ठेवणे तसेच निकाल जाहीर करणे, इ. महत्त्वाची कामे निवडणूक आयोगाला करावी लागतात.
- निवडणुकांसंबंधी निर्माण झालेल्या वादामध्ये न्यायालयाला हस्तक्षेप करता येणार नाही. स्थानिक शासनातील संस्थांच्या विविध मतदारसंघांच्या सीमा निश्चित करणे, तेथील जागा वाटपासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नासंदर्भात कोणत्याही न्यायालयात अपील करता येणार नाही.
- २० एप्रिल १९९३ च्या या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेत ११ वी अनुसूची समाविष्ट केली असून या परिशिष्टात पंचायतराजच्या संदर्भात येणाऱ्या २९ विषयांचा समावेश केला आहे.

## राज्यघटनेतील अकरावी अनुसूचित मधील विषय

१) कृषी विस्तारासह शेती
२) भू – विकास जमीन सुधारणांची अंमलबजावणी, जमिनीचे एकत्रीकरण मृदसंधारण
३) पाण्याचे व्यवस्थापन, लघु पाटबंधारे आणि पाणलोट विकास
४) पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय आणि कुकूटपालन
५) मासेमारी
६) सामाजिक वनीकरण व शेती वनीकरण
७) किरकोळ वन उत्पन्न
८) अन्नप्रक्रिया व लघु उद्योग
९) ग्रामोद्योग, कुटिरोद्योग व खादी उद्योग

## ग्रामपंचायतीने करावयाची कामांची यादी

१०) ग्रामीण गृह निर्माण
११) पिण्याचे पाणी
१२) इंधन व चारा
१३) रस्ते, नाली, पूल, नदी, जलमार्ग व दळणवळण अन्य साधने
१४) ग्रामीण विद्युतीकरण, विजेचे वाटप
१५) अपारंपरिक ऊर्जा साधने
१६) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम
१७) प्राथमिक व माध्यमिक शाळांसह शिक्षण
१८) तांत्रिक व व्यावसायिक शाळांसह शिक्षण
१९) प्रौढ व अनोपचारिक शिक्षण
२०) ग्रंथालय
२१) सांस्कृतिक कार्यक्रम
२२) बाजार व यात्रा
२३) रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने यासह आरोग्य व स्वच्छता
२४) कुटुंब कल्याण
२५) स्त्रिया व बालविकास
२६) अपंग व मतिमंद यांच्या कल्याणासह समाजकल्याण
२७) दुर्बल घटकांचे कल्याण व अनुसूचित जाती ( SC ) व अनुसूचित जमाती ( ST ) कल्याण
२८) सार्वजनिक वितरण व्यवस्था
२९) समाजाच्या मौल्यवान ठेव्यांच्या सांभाळ करणे.

- २३ एप्रिल १९९४ पासून महाराष्ट्रात ७३ व्या घटना दुरुस्तूची अंबलबजावणी. १९६६ मध्य महाराष्ट्र शासनाने आपल्या १२३ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या आहेत.
- अरुणाचल प्रदेशात अनुसूचित जाती ( एस. सी ) साठी याना राखीव जागांची तरतूद नाही.
- ७३ व्या घटनादुरुस्तीची अमबलबजावणी करणारे देशातील पहिले राज्य मध्यप्रदेश होय.

## ❑ ७४ वी घटनादुरुस्ती :

- ७४ वी घटनादुरुस्ती ही शहरी पंचायतराजशी निगडित आहे. ७४ व्या घटनादुरुस्तीचे विधेयकही १९९२ साली मान्य झाले. त्यानुसार एक जून १९९३ पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.
- नगरपालिका शीर्षकाखाली भाग ९-अ मध्ये २४३ (पी) ते २४३ (झेड, जी) ही कलमे व १२ वे परिशिष्ट जोडले.
- कलम २४३ (क्यू) नुसार, प्रत्येक राज्यात तीन नागरी, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करता येतील. त्यात नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांचा समावेश होतो. कलम २४३ (आर) नुसार, प्रत्यक्ष निवडणुकीतून जागा भरल्या जातील. प्रत्येक नगरपालिका क्षेत्राची प्रभागात प्रादेशिक मतदारसंघामध्ये विभागणी केली जाईल. त्याचबरोबर प्रभाग समित्यांची स्थापना करण्यासंदर्भातील तरतुदी केल्या आहेत.
- कलम २४३ (टी) नुसार, अनुसूचित जाती, जमाती, महिला, मागासवर्गासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे.
- कलम २४३ (यू) नुसार, पाच वर्षांचा कार्यकाल आहे. शहरी पंचायतराजमधील एखादी संस्था राज्यशासनाने कार्यकाल पूर्ण होण्या अगोदर बरखास्त केली तर सहा महिन्यांच्या आत तेथे निवडणूक घ्यावी लागते.
- कलम २४३ (वाय) नुसार, राज्यपाल या आयोगाची स्थापना करतील व हा आयोग राज्यपालांना वित्त आयोग महत्त्वाच्या आर्थिक बाबीबाबत अहवाल देईल.
- राज्याकडून आकारले जाणारे कर, शुल्क, पथकर व शुल्क यापासून मिळणारे उत्पन्न राज्य व नगरपालिका यांच्यात विभागणी करणे. याबाबत अहवाल देण्यात येईल.
- कलम २४३ (झेड-ए) नुसार, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका स्वच्छ, खुल्या वातावरणात घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९९४ साली राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली आहे.
- कलम २४३ (झेड-डी) नुसार, राज्यातील जिल्हा पातळीवर त्या जिल्ह्यातील नगरपालिकांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करून संपूर्ण जिल्ह्याचे एकच प्रारूप विकास योजना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीची स्थापना केली आहे.

## बारावी अनुसूचित समाविष्ट (१९९२-९३) विषय

१) नगर नियोजनासह शहर नियोजन
२) जमीन वापरासंबंधी व बांधकामासंबंधी नियमन
३) आर्थिक व सामाजिक विकासासंबधी योजना
४) रस्ते व पूल
५) घरघुती, औद्योगिक आणि व्यापारी उद्देशासाठी पाणी पुरवठा
६) सार्वजनिक आरोग्य, सच्छतेचे संवर्धन आणि कचऱ्याचे व्यवस्थापन
७) अग्निशमन सेवा
८) नागरी वनीकरण, पर्यावरणाचे संरक्षण
९) अपंग, मतिमंद व समाजातील दुर्बल घटकांच्या हितांचे रक्षण
१०) झोपडपट्टी सुधारणा कारण विकास करणे.
११) शहरे, दारिद्र्याचे निराकरण करणे
१२) शहरी सोयी सुविधा पाठविण्यासाठी प्रयत्न करणे
१३) सांस्कृतिक, शैक्षणिक व शहरांचे सोंदर्य वाढविणाऱ्या बाबिना प्रोत्साहन देणे
१४) स्मशानभूमी, दफनभूमी व विदुत – दाहिनी
१५) कोंडवाडा, पशूंवरील अत्याचाराला प्रतिबंध करणे
१६) जन्म मृत्यूच्या नोंदींची आकडेवारी
१७) रस्त्यावरील दिवाबत्ती, वाहनतळ, बसस्थानके व सार्वजनिक सोयीसह स्वच्छतेची सोय.
१८) कत्तलखाने व कातडी कमावण्याचे कारखाने यांचे नियमन करणे.

## ❑ ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीच्या मर्यादा :

१) पंचायत राज विकेंद्रीकरणाच्या अधिकार राज्य सरकारकडे
२) राज्य सरकारकडून मिळणारा अपुरा निधी
३) नोकरशाहीचे वाढते वर्चस्व
४)विषय सूची बाबतीत अस्पष्टता
५) पंचायत राज संस्थांना स्वतःची उत्पादनाची साधने नाहीत.

६) वाढत्या नागरीकरणास तोंड देण्यासाठी निधीची व साधनांची कमतरता
७) कमकुवत स्वरूपाचा राज्य वित्त आयोग
८) राजकीय पक्षांचे वाढते प्राबल्य
९) विकास योजना व नियोजन आराखड्यास मान्यता देण्यास होणारा विलंब
१०) घराणेशाहीचे सतत वाढते वर्चस्व.
११) ग्रामसभा शक्तीशाली परंतु कमकुवत स्वरूप

★★★★★